नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प

वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी आणि भारत मौसम विभाग

ईमेल- mahapocra@gmail.com, gkmsparbhani@yahoo.com

जालना जिल्हा कृषि हवामान सल्ला मंगळवार, दिनांक - ०९.०७.२०१९

| हवामान घटक | हवामान अंदाज (दिनांक: १०/०७/२०१९ ते १४/०७/२०१९) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | १०/०७ | ११/०७ | १२/०७ | १३/०७ | १४/०७ |
| पाऊस(मिमी) | ०४.० | ०६.० | ०३.० | ०४.० | ०४.० |
| कमाल तापमान (.से.अं) | ३२.० | ३३.० | ३३.० | ३३.० | ३३.० |
| किमान तापमान (.से.अं) | २३.० | २३.० | २४.० | २४.० | २४.० |
| ढग स्थिती | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ | ढगाळ |
| सकाळची सापेक्ष आद्रता (%) | ८२ | ८१ | ८० | ७९ | ७८ |
| दुपारची सापेक्ष आद्रता (%) | ६२ | ५८ | ५८ | ५५ | ५४ |
| वाऱ्याचा वेग (तास/किमी) | १७ | १५ | १६ | १५ | १९ |
| वाऱ्याची दिशा | नैऋत्य | पश्चिम | पश्चिम | नैऋत्य | नैऋत्य |

जालना जिल्हयात पुढील पाच दिवसात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे.

| पिकाचे नाव | अवस्था | कृषी सल्ला |
|---|---|---|
| कापूस | लागवड | कापूस पिकाची लागवड १५ जुलैपर्यंत करता येते. पेरणी योग्य पाऊस (७५ मिमी पेक्षा जास्त) झाल्यास बीटी कापूस पिकाच्या कमी कालावधीच्या वाणांची निवड करावी. |
| तुर | लागवड / पेरणी | पेरणी योग्य पाऊस (७५ मिमी पेक्षा जास्त) झाल्यास तुरीच्या कमी कालावधीच्या (बीडीएन-७०८, बीडीएन-७११) वाणांची निवड करावी. |
| मुग / उडीद | पेरणी | पुढील काळात मुग / उडदी पिकाची पेरणी करू नये. |
| भुईमूग | पेरणी | पुढील काळात भुईमूग पिकाची पेरणी करू नये. |
| मका | पेरणी | मका पिकावरील लष्करी अळीच्या व्यवस्थापनासाठी बियाण्यास सायएन्ट्रीनिलीप्रोल १९.८० टक्के + थायोमिथॉक्झाम १९.८० टक्के ४ मिली प्रती किलो बियाण्यास बिजप्रक्रीया करावी. |
| केळी | वाढीची अवस्था | केळी बागेतील तणांचे नियंत्रण करून आवश्यकता असल्यास बागेस पाणी व्यवस्थापन करावे. |
| आंबा | वाढीची अवस्था | आंबा फळबागेत ५००: ५००: ५०० ग्रॅम नत्र, स्फुरद, पालाश + ५० किलो शेणखत प्रती झाड खतमात्रा दयावी. |
| द्राक्ष | वाढीची अवस्था | द्राक्ष बागेत वेलीवरील पानांची संख्या नियंत्रीत करावी. तसेच बागेत रोगनाशकाची फवारणी करावी. |
| सिताफळ | वाढीची अवस्था | सिताफळ फळ बागेत ३००: ३००: ३०० ग्रॅम नत्र, स्फुरद, पालाश + ५० किलो शेणखत प्रती झाड खतमात्रा दयावी. |
| भाजीपाला | लागवड | वेलवर्गीय भाजीपाला पिकाची लागवड केली नसल्यास लागवड करून पिकास हलके पाणी दयावे. |
| फुलशेती | वाढीची अवस्था | गुलाब फुलपिकावरील रसशोषन किडीचा प्रादुर्भाव दिसुन किडीच्या व्यवस्थापनासाठी डायमिथोएट ३० टक्के २०० मिली प्रती एकर याप्रमाणात फवारणी करावी. |
| तुती रेशीम उदयोग | -- | तुती लागवड जुन ते सप्टेंबर महिन्यापर्यंत हलक्या, मध्यम ते भारी जमिनीत करता येते. तुती बेण्यापासून गादी वाफयावर रोपावाटीका करून तीन महिन्यानंतर रोपे शेतात लावगड करावी. बेणे लागवड करताना ०.२ टक्के बावीस्टीन या बुरशीनाशकाची बेणप्रक्रीया करूनच लागवड करावी. |

| | | |
|---|---|---|
| पशुधन व्यवस्थापन | -- | या महिन्यामध्ये घरगुती माशा व तत्सम प्रकारच्या माशांचा प्रादुर्भाव गोठयामध्ये जास्त प्रमाणात आढळतो म्हणून ५ टक्के निंबोळी अर्क गोठयामध्ये, परिसरामध्ये व पशुधनाच्या शरीरावर फवारावा. |

सदर कृषि हवामान सल्ला पत्रिका वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करण्यात आली असून नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे